प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

हवामानावर आधारीत कृषि सल्ला (दापोली तालुका)

(०२३५८) २८२३८७

अंक २४/२०१९ दिनांक २२/०३/२०१९ कालावधी ५ दिवस

डॉ. सुभाष चव्हाण,	डॉ. विजय मोरे,	डॉ. शितल यादव,
विभाग प्रमुख,	नोडल ऑफिसर,	तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग	कृषिविदया विभाग	कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७	९४२२३७४००१	८३७९९०११६०

मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १६/०३/२०१९ ते २२/०३/२०१९)							हवामानाचे घटक	हवामान पूर्वानुमान (दिनांक २३/०३/२०१९ सकाळी ८:३० पासून २७/०३/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)				
१६/०३	१७/०३	१८/०३	१९/०३	२०/०३	२१/०३	२२/०३		२३/०३	२४/०३	२५/०३	२६/०३	२७/०३
०.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	पाऊस (मिमी)	०.०	०.०	०.०	०.०	-
३४.८	३४.५	३२.०	३२.२	३३.२	३२.४	३१.२	कमाल तापमान (अं.से)	३३.४	३३.८	३२.६	३७.१	-
१४.०	१४.१	१३.५	१३.०	१३.०	१४.५	१२.०	किमान तापमान (अं.से)	१९.७	१८.४	१९.५	२०.३	-
०	०	०	०	०	०	०	मेघाच्छादन (ऑक्टा)	०	०	०	०	-
७९	८९	८९	९१	८९	९०	८८	सकाळची सापेक्ष आर्द्रता	६९	८०	७८	८४	-
४५	४५	५९	५८	५५	४५	५४	दुपारची सापेक्ष आर्द्रता	५६	५५	६२	५२	-
४.३	४.०	४.२	३.७	४.५	५.२	४.५	वाऱ्याचा वेग (किमी/तास)	०१६	०११	०१२	०११	-
शांत	शांत	शांत	शांत	शांत	शांत	शांत	वाऱ्याची दिशा	वा.प.	वा.प.	वा.प.	वा.प.	-

पाऊस (मिमी) मागील आठवडयातील	पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत	पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा
०.०	०.०	३०७१.८

हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

दिनांक २३ ते २६ मार्च, २०१९ पर्यंत वाऱ्याचा वेगात ११ ते १६ कि.मी. पर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे.

पिक	अवस्था	कृषि सल्ला
उन्हाळी भात	पोटरी अवस्था	• भात पिक पोटरी अवस्थेत असल्याने शेतामध्ये पाण्याची पातळी ५ ते १० सें. मी. पर्यंत ठेवावी.
भुईमुग	शेंगा अवस्था	• भुईमुग पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी ०.२५ टक्के मॅन्कोझेब बुरशीनाशकाची फवारणी करावी व रोगाची तीव्रता पाहून १५ दिवसांच्या अंतराने फवारणी कराव्यात. • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पिकास जमिनीच्या मगदुरानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी दयावे.
आंबा	फलधारणा अवस्था (गोटी ते सुपारी अवस्था)	• आंब्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी व फळांची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व सुपारी एवढी असताना १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी. • तापमानातील होणाऱ्या बदलामुळे आंब्याची फळगळ होण्याची शक्यता आहे. फळगळ कमी करण्यासाठी फळधारणा झाल्यावर पाण्याच्या उपलब्धतेनुसार आंब्याच्या झाडास १५० ते २०० लिटर पाण्याच्या ३ ते ४ पाळ्या १५ दिवसांच्या अंतराने दयाव्यात आणि झाडाच्या बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा. • फळे गोटी आकाराचे असताना फळाचा आकार, फळाचे वजन फळामधील साका आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० आकाराची बटर पेपर किंवा कागदी पिशवी लावावी. • पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा. • तापमानात वाढ संभवत असल्याने, कलमांच्या आळ्यातील पाण्याचे बाष्पीभवन कमी होण्यासाठी वाळलेले गवत, पालापाचोळा किंवा पोलीथीनचे आच्छादन करावे तसेच पाणी देण्याची व्यवस्था करावी.
काजू	फलधारणा व पक्वता	• काजू पिकामध्ये काही ठिकाणी काढणी योग्य बी तयार झालेली आहेत. तयार झालेल्या बिया बोंडापासून वेगळ्या करून बिया उन्हामध्ये ७ ते ८ दिवस वाळवाव्यात. तसेच विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे काजू बोंडापासून विविध टिकावू पदार्थ तयार करावेत. • पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा. • तापमानात वाढ संभवत असल्याने, कलमांच्या आळ्यातील पाण्याचे बाष्पीभवन कमी होण्यासाठी वाळलेले गवत, पालापाचोळा किंवा पोलीथीनचे आच्छादन करावे तसेच पाणी देण्याची व्यवस्था करावी.
नारळ	-	• तापमानात वाढ संभवत असल्याने, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. • नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार दयावा तसेच कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून पहिली दोन वर्षे रोपांना वरून सावली करावी.
सुपारी	-	• तापमानात वाढ संभवत असल्याने, सुपारी बागेत ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.
चिकू	फुलोरा व फलधारणा	• तापमानात वाढ संभवत असल्याने, चिकू बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आच्छादनाचा वापर करावा.
भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका	फलधारणा	• उन्हाळी भेंडी पिकाचे तुडतुड्यापासून नियंत्रण करण्यासाठी पेरणीनंतर १० ते १५ दिवसांनी फोरेट १० जी १० किलो प्रती हेक्टरी या प्रमाणात झाडाभोवती मातीत मिसळावे. किडग्रस्त शेंडे/ पाने नष्ट करावीत. शेतामध्ये पिवळ्या चिकट कागदाच्या सापळ्याचा वापर करावा. • टोमॅटो, वांगी, मिरची पिकावर पांढरी माशी, तुडतुडे, मावा किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मॅलेथीऑन २० मि.ली किंवा डायमेथोएट १५ मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून १०-१५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. • फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. • फळबाग रोपवाटिकेतील गवत काढून स्वच्छता ठेवावी व गरजेनुसार रोपांसाठी सावली करावी.
दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन	-	• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल. • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ पाणी ४ ते ५ वेळेस पाजावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे. • दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे व जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करावे. • पशु वैदकांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष्यांना रानीखेत प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा